स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानवविद्या शाखांतर्गत अर्थशास्त्र विषयाचा संशोधन आराखडा.

‘शासकीय निवडक कृषीपूरक योजनांचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील योगदान: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा’

संशोधक

पूनम गंगाधरराव रामोड

सामाजिक शास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. विजय ना. भोपाळे
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा (जं.)
जिल्हा.परभणी

प्रस्तावना :-

कृषी व्यवसाय हा मानवी जीवनाच्या उत्क्रांतीतील महत्वपूर्ण व भारतातील सर्वात जुने आणि परंपरागत स्वरुपाचा व्यवसाय असून देशातील शेती क्षेत्राच्या विकासावरच देशातील उद्योगधंदे, आंतरराष्ट्रीय व्यापार, दळणवळण, वाहतूक तसेच सेवा क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्था इत्यादींचा विकास अवलंबून आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ब-याच वर्षापर्यंत भारताला अन्नधान्यांची आयात करावी लागत होती. मात्र आज भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला असून भारत धान्याचे कोठार बनला आहे, आज देशातील उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय हे कृषी क्षेत्रावरच आधारित आहेत. कारण कृषी क्षेत्रातून उत्पादन करण्यात येणाऱ्या कच्चा मालावरच औद्योगिक व उद्योग क्षेत्र आपला विकास साध्य करतात.

संशोधनात्मक अभ्यास करताना, त्या क्षेत्राचा सर्वांगीण अभ्यास करणे महत्वाचे ठरते. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये निवडक शासकीय योजनांच्या योगदानाचा अभ्यास करीत असताना तेथील ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते म्हणून नांदेड जिल्ह्यातील उपरोक्त पार्श्वभूमीवरच वित्तीय व्यापारी संस्था, हवामान, दळण-वळणाची साधणे, वीज, दुरसंचाराची माध्यमे, पर्यावरणीय घटक आणि शेतीशी संबंधीत असणारे पुरक व्यवसाय अवलंबून आहेत. यांचा थोडक्यात आढावा आपण घेऊ.जागतिक पातळीचा विचार करता पृथ्वीवरील भू-भागाचे क्षेत्रफळ ५१,००६५,६०० चौ.की.मी. एवढे आहे. अशा या विस्तृत भू-भागाची विभागणी सात खंडातकेली जाते. या विस्तृत भू-भागावर १९५ देश वसलेले आहेत. यातील 'रशिया' हा सर्वात मोठा तर 'व्हेटीकन सिटी' हा सर्वात लहान देश आहे. सात खंडापैकी आशिया खंडात भारताचा समावेश केला जातो.

भौगोलिक दृष्ट्या भारताचे स्थान उत्तर गोलार्धात आहे. भारताचा अक्षांश विस्तार ८.४° उत्तर अक्षांश तर रेखांश विस्तार ६८.७० पूर्व रेखावृत्त ते ९७.३० पूर्व रेखावृत्त आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ ३२,८७२६३ चौ.की.मी. आहे; जे जगाच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.६४ % आहे. भारताला ७५१६.६ कि.मी. एवढा समुद्र किनारा लाभलेला आहे.भारताच्या उत्तर पश्चिमेकडे पाकिस्तान व अफगाणिस्तान असून व उत्तरेकडे चीन, नेपाळ, भुतान आहेत, पुर्वकडे मानमर व बांग्लादेश आहे तर दक्षिणेस श्रीलंका आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी आहे. सध्या २०१८ या वर्षाचा विचार

केला तर भारताची एकूण लोकसंख्या १,३५४,८६१५५९ एवढी असल्याचे दिसून येते. यामध्ये शहरी लोकसंख्येचे प्रमाण ३३.२ टक्के तर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६६.८ टक्के एवढे आहे.भारतात एकूण २९ राज्य व ७ केंद्रशासीत प्रदेश आहेत, यातील प्रगतीशिलदराला ओळखले जाते. १ मे १९६० रोजी मुंबईसह मराठी भाषिकानचेराज्य तयार झाले दिसून येते, यामध्ये शहरी लोकसंख्येचे प्रमाण ३३.२ टक्के तर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६६.८ टक्के एवढे आहे.भारतात एकूण २९ राज्य व ७ केंद्रशासीत प्रदेश आहेत. यातील प्रगतीशिल राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. १ मे १९६० रोजी मुंबईसह मराठी भाषिकाचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्य हे भारताच्या मध्यवर्ती भागात असून उत्तर व दक्षिण भारतास एकत्रीत असणारा विशाल भूप्रदेश या राज्याला लाभलेला आहे. महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार १५.८० अंश उत्तर अक्षवृत्त ते २२ % उत्तर अक्षवृत्त असून रेखांश विस्तार ७२.६० पूर्व रेखावृत्त आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात एकूण ६ प्रशासकीय विभाग आहेत या सहा प्रशासकीय विभागामध्ये राज्यातील ३६ जिल्ह्याची विभागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रात एकूण ३५८ तालुके आहेत.

नांदेड जिल्हा हा महाराष्ट्रातील व भारतातील एक महत्वाचा जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी हा जिल्हा जून्या हैद्राबाद राज्यात मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच समाविष्ठ करण्यात आला होता. यापूर्वी हा जिल्हा निजाम संस्थानाचा एक भाग होता. निजाम संस्थान भारतात विलीन झाल्याने हा भाग साहजिकच हेद्राबाद राज्याचा एक भाग बनला, सन १९५६ च्या भाषावार प्रांत रचनेनंतर सर्व मराठी भाषिकाचे जिल्हे सुरुवातीला मुंबई राज्यात व सन १९६० मध्ये महाराष्ट्र व गुजरात राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्र या मराठी भाषिक राज्यात समाविष्ट करण्यात आले.नांदेड जिल्हा हा दक्षिण भारताच्या पठाराच्या भागात वसलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील समान सपाट जिल्ह्यापैकी एक जिल्हा आहे.

नांदेड जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भाग हलक्या व माळरान जमिनीचा आहे. त्यामुळे तो थोडाफार इतर भागापेक्षा वेगळा आहे. जिल्ह्यातील किनवट व माहूर तालूके ही डोंगराळ व शेतीसाठी अयोग्य अशा जमिनीची तालुके आहेत मात्र जिल्ह्यातील उर्वरित भाग सपाट, सुपीक व काळीची जमोन असलेला आहे. नांदेड जिल्ह्यातील भोकर व हदगाव तालुक्यात वारखेड पर्वत रांगा तर कंधार व मुखेड तालुक्यात बालाघाट या पर्वत रांगा आहेत.नांदेड जिल्ह्याचे प्रशासकीय सोयीच्या दृष्टिकोणातून सुरुवातीला तीन तर आता पाच महसुली उपविभागत विभाजन करण्यात आले आहे. या महसूली उपविभागात नांदेड, देगलूर,

किनवट, भोकर, बिलोली यांचा समावेश होतो. नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

नांदेड जिल्हा हा मराठवाड्यातील सुपीक जमीन असलेला भाग असून पेवील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. जसे भारताच्या दृष्टिने शेतीला प्राथमिक स्थान आहे अगदी तसेच नांदेडजिल्ह्यातही शेतीला प्राथमिक स्थान आहे. सन २०१८ मा जनगणनेनुसार नांदेड जिल्हातील जवळ जवळ ५६१% लोकसंख्या ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या शेती क्षेत्रावरच उदरनिवांसाठी अवलंबून असल्याचे दिसून येते."स्वातंत्र्यपूर्व कालखंडाचा विचार केला तर जुन्या हेदावाद राज्याच्या गॅझेटिअरमधील सन १९०९ सालच्या आकडेवारीनुसार नदिड जिल्ह्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर ज्यांचे जीवन अवलंबून होते असे १,७१,६०० इतके लोक असून त्यांचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण ३४% इतके आहे.

संशोधन साहित्याचा आढावा

डॉ.सुधीश कुमार पटेल (फेब्रुवारी २००८):

'कृषी में रोजगार के बढ़ते अवसर' या लेखात संशोधकांनी भारतातील शेती क्षेत्रामध्ये रोजगार वाढवण्यासाठी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता शेतीबरोबरच शेती पूरक व्यवसाय केला पाहीजे ज्यामुळे ग्रामीण जनतेला वर्षभर काम मिळण्यास मदत होईल असे स्पष्ट केले आहे. भारत हा कृषीप्रधान देश असून सुध्दा येथे शेतकन्यांना अनेक नेसगीक आणि आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो तेंव्हा शेतकन्यांनी केवळ शेतो पावरच अवलंबून न राहता शेतीबरोबरच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, फळ व फुल शेती या सारख्या व्यवसायांची निवड केल्यास शेतक-यांना पूर्णवेळ आणि वर्षभर रोजगार मिळण्याबरोबरच त्यांचा आर्थिक विकास साध्य होऊ शकतो असे ते या संशोधनात सांगीतले आहे.

डॉ. सुधीर कुमार पटेल, 'कृषीमध्ये प्रगती के अवसर, कुरु क्षेत्र, अंक, ५४, फेब्रुवारी २००८ वर्ष ०४ पृ. क्र. ४ ते ७.

अ. वि. सहस्त्रबुधे (२०१०):

'शेती. भारत देशाला लाभलेले बहुमूल्य वरदान' या पुस्तकामध्ये लेखक अ.वि. सहस्त्रबुध्दे यांनी शेती हा व्यवसाय व्यावसायाभिमुख केल्यास आर्थिक प्रगती साध्य करण्यास कसे फायदेशीर आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकांचा विचार केला तर ते एक इंजिनिअर आहेत व त्यांचा व शेतीचा

काहीही संबंच नाही परंतु काही काळ त्यांना खेड्यामध्ये राहावे लागल्यामुळे त्यांनी आपले क्षेत्र व शेतीक्षेत्राची तुलना केली व त्याचा परिणाम म्हणून त्यांनी निष्कर्ष काढला असता भारतातील शेतीची गंभिर परिस्थतों व शेतक-यांच्या आर्थिक अधोगतीची कारणे त्यांच्या लक्षात आल्याचे ते सांगतात,उद्योग क्षेत्रामध्ये प्रत्येक गोष्टीचा व प्रत्येक घटकाचा पुर्ण उपयोग केला जातो तर शेतीमध्ये मात्र कितीतरी शेत जमीन शेतकरी पडीक स्वरुपात ठेवतात, शेतकऱ्यांनीआपली शेती केवळ पारंपारिक पध्दतीने करतो त्यामुळे त्या शेतीपासून त्यांना पाहिजे त्या प्रमाणात उत्पन्न मिळत नाही याचा परिणाम म्हणूनच आज ते आर्थिक कचाट्यातसापडल्याचे लेखक सांगतात, पुढे लेखक म्हणतात की शेती ही केवळ अन्नधान्य उत्पन्नाचे साधन न मानता त्याकडे उद्योगाच्या दृष्टीने पाहिले पाहिजे तरच शेती व शेतकऱ्याचा विकास होऊ शकतो, शेतकऱ्यांनी आपली शेती ही व्यावसायिक दृष्टिने करावों व त्यामध्ये काळानुरूप बदल केला पाहिजे तरच शेती आज करणे परवडेल असे लेखकाला वाटते. म्हणून या आपल्या पुस्तकात लेखकांनी केवळ शेतकऱ्यांनी शेती कशी करावी एज सांगता शेतीमध्ये कसे प्रयोग करावे व शेतीकरण्याच्या कोणत्या पध्दती आउ सविस्तर आढावा प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून घेतल्याचे दिसून येते.

संदर्भ विनाश विनायक सहस्त्रबुध्चे, 'शेती- भारत देशाला लाभलेले बहुमूल्य वरदान

प्रतिमा प्रकाशराव पाटील (मे २०१३):

'उस्मानाचाद जिल्ह्याच्या कृषी विकासात फळबागांची भूमिका' या आपल्या संशोधनामध्ये शेती विकासात व शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये फळबागांचे असलेले महत्व त्यांनी स्पष्ट केले आहे. आजही भारतातील अधिकाधिक लोकसंख्येचा प्रमुख व्यवसाय व उत्पन्नाचा एक मोठा स्त्रोत कृषी हाच आहे. विकसनशील देशातील शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने तो राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा स्त्रोत, रोजगाराचे व जीवन निर्वाहाचे प्रमुख साधन, औद्योगिक विकास, वाणिज्य तसेच विदेशी व्यापाराचा प्रमुख आधार आहे कृषों विकासाच्या आधारावरच आज जगातील काही विकसित देश आर्थिक विकासाच्याशिखरावर पोहचले आहेत. जसे अमेरिका, इंग्लड, जर्मनी इ. देशाच्या विकासात कृषीचे महत्व अनन्यसाधारण आहे, आर्थिक विकासात कृषीची भूमिका स्पष्ट करताना लेखकांनी कृषी विकासात फळबागांचे कसे योगदान आहे व फळबागांमुळे देशातील विशेषतः संशोधकानी निवडलेल्या अभ्यास क्षेत्रामध्ये शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय म्हणून फळबाग किंवा फळशेतीची निवड केल्यामूळे शेतकऱ्यांना त्याचा कसा फायदा झाला हे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी या प्रबंधात केल्याचे दिसून येते.प्रस्तूत प्रबंधामध्ये लेखकांनी कृषी क्षेत्राचे भारतीय

अर्थव्यवस्थेमध्ये असलेले महत्व स्पष्ट करताना शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा, रोजगार पुरवठ्यातील योगदान, अन्नधान्य पुरवठ्यातील महत्व, औद्योगिक विकासात सहाय्य, विदेशी चलन प्राप्तीतील योगदान, उद्योगांना कच्या मालाचा पुरवठा करुन देणे, भांडवल निर्मितीतील सहाय्य, दारिद्रध निर्मूलनाबाबत योगदान अशा विविध क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास या संशोधनात केला आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांना फळबागाचे व फळ शेतीचे महत्व पटले असून आज फळबागांची महासत्ता प्रस्थापित झाल्याचे दिसून येते. हजारो वर्षे परंपरेने चालत आलेल्या धान्याच्या शलौला आणि नगदीचे पीक म्हटल्याबरोबर समोर येणाऱ्या ऊस पा एकाच पिकाला समर्थपणे पर्याय उभे करण्याचे काम फळबागांनी केले आहे. त्यामूळे या फळबागांच्या अलौकीक सामर्थ्याची जाणीव शेतकऱ्यांना झालेली असून त्यांच्या नित्यनूतन आराधनेचा, चिंतनाचा, चर्चेचा तो विषय बनलेला आहे. इतकेच काय पण फळपीकनिहाय शेतक-यांच्या संघटना उभ्या राहिल्या असून त्यांनी संघटीतपणाने व सामुदायिकरित्या काम करण्याचे महत्व ओळखून ज्या पध्दतीने पावले टाकायला सुरुवात केली आहे, ती पाहता देशात आणि जगात उत्पादनाच्या फतळीवर महाराष्ट्र फलोत्पादनात अग्रेसर राहील, याविषयी कोणाच्याही मनात शंका असणार नाही,महाराष्ट्रात व विशेषतः उस्मानाचाद जिल्ह्यामध्ये फळवाणेचा होत असलेला विकास आणि या फळबागांची प्रगती करुन जास्तीत जास्त उत्पन्न कसे प्राप्त करता बैंक शफ्ते हे सांगण्याबरोबरच फळबागांसाठी शासन स्तरावर कोणाचा योजना रोचवल्या जात आहेत आणि यातील असणाऱ्या त्रुटीचायात शासनाने कोणत्या आणखी उपाययो केल्या पाहिजेत याचाचत सविस्तर आढावा घेवून शासनाला शिफारशी केल्याचे दिसते.

संदर्भ प्रतिमा प्रकाशराव पाटील, “उस्मानाबाद जिल्ह्याच्या कृषी विकासात फळ बागांची भूमिका” पीएच.डी. प्रबंधडॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद .

दीपिका कच्छल आणि ललिता खुराना (जानेवारी २०१७) :-

दीपिका कच्छल आणि ललिता खुराना यांनी आपल्या लेखामध्ये भारतीय शेती आणि भारतीय शेतीमध्ये पुरक व्यवसायाचे असणारे महत्व मांडले आहे, ते असे म्हणतात की, भारतातील ७० टक्के जनता ही शेतीवर अवलंबून असल्यामुळे त्यांना केवाळशेतीमुळेच पूर्ण हंगाम काम मिळणार नाही व मिळालेच तर त्या शेतोच्या उत्पन्नापासून त्यांचा उदरनिर्वाह पूर्ण होऊ शकत नाही म्हणून शेती या व्यवसायात केवळ शेतीवरच विसंबून न राहता शेतीपूरक व्यवसाय केला पाहिले ज्यामुळे आपल्याला आर्थिक अडचणीपासून काही प्रमाणात मुक्ती मिळेल.भारतामध्ये शेतीबरोबरच पशुपालन हा व्यवसाय अगदी पुर्वकाळापासून

चालत आहे तेंका प्रत्येक शेतकरी हा पशुपालनाचा व्यवसाय करतो पण नाज पशुपालनाच्या संकल्पनेत बदल होऊन दुग्ध व्यवसायाच्या दृष्टिले नवनविन गोपालनाला उत्तेजन मिळत आहे ज्यामुळे देशातील दुधाची गरजही पूर्ण होत आहे आणि दुसन्या बाजूने विचार केला तर शेतक-यांना मोठा आर्थिक लाभही मिळण्यास मदत होत आहे. भारतात पुरक व्यवसाय म्हणून आज शेतकरी केवळ पशुपालन हाच व्यवसाय करीत नसून याबरोबरच कुक्कुट पालन, मत्स पालन, शेळी व मेंढी पालन, मधुमक्षीका पालन यासारख्या अनेक व्यवसायाला चालना मिळाली आहे.भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने विचार करता या व्यवसायांना महत्वपूर्ण स्थान आहे, त्यासाठी आज शासन मोठ्या प्रमाणात या व्यवसायांसमोर येणान्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि शेतक-यांना या व्यवसायांकडे वळवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.

संदर्भ:- दिपीका कच्छल आणि ललिता खुराना, 'पशुपालन. विविध आयाम', कुरुक्षेत्र

वीरेन्द्र कुमार (२०१७)

डॉ. विरेन्द्र कुमार पोनी आपल्या लेखामध्ये भारतीय डेपरो उद्योग व भारतातील पशुचन यावर संशोधन केले आहे. भारत हा पशुपालनाच्या बाबतीत जगात प्रबम क्रमांकाचा देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था हो द्वापीण भागात वसलेली असून येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. त्यामुळे येथील लोकांना शेतीबरोचरच पशुपालन करण गरनेचे होते कारण गुची शेतीतील सर्व कामे ही पशुंच्या साह्याने केली वरळानुरूप शेतीमध्ये अत्याधुनिक साधनांचा उपयोग केल्यामुळे पशुंची गरज असल्याचे दिसून येते.

प्रभाकरराव उत्तरवार (एप्रील २०१८) :

प्रभाकरराव उत्तरवार हे यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यातील भांब या गावचे रहिवाशी आहेत. त्यांच्याकडे ४० हेक्टर शेती आहे पण ते नेहमी आपल्या पारंपारिक शेतीला कंटाळले होते म्हणून त्यांनी आपल्या शेतीमध्ये पारंपारिक शेतीपेक्षा जास्त उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय म्हणून सागवान शेती करण्याचा निश्चय केला. त्यांना पूर्वीपासूनच पर्यटनाची आवड असल्यामुळे विदेशात असणाऱ्या आपल्या मुलांना भेट देता यावी म्हणून त्यांनी या वन शेतीचा स्विकार केल्याचे दिसून येते. सुरुवातीला त्यांनी आपल्या २० हेक्टर शेतीमध्ये सागवानाची लागवड केली. सुरुवातीला पारंपारिक शेतीपेक्षा यामध्ये गुंतवणूक करणे थोडे धोक्याचे होते परंतू त्यांनी हा धोका स्विकारुन सागवान शेती करण्यास सुरुवात केली आणि याचा मोठा आर्थिक लाभ त्यांना झाल्याचे दिसून येते.प्रभाकरराव उत्तरवार यांनी आपल्या

सागवानच्या रोपट्यांना कोणतीही स्पर्धा नको म्हणून यात कोणतेही पिक न घेता त्यांनी केवळ सागवानचीच लागवड केली त्यामुळे सागवानच्या वाढीला चालना मिळून त्यांची जलद वाढ होण्यास मदत झाली. यांनी आपल्या शेतातील सागवान विक्रिसाठी शासनाच्या धोरणाची अडचण येऊ नये म्हणून त्यांनी सागवान शेतीची नोंद आपल्या सातबारा उताऱ्यावर केली ज्यामुळे त्यांना या झाडांची विक्रि करण्यास कोणतीही अडचण झाली नाही, सागवान शेतीला कमी खर्च येत असून मनुष्याच्या श्रमाचाही कमीच उपयोग होत होता त्यामुळे पुढे प्रभाकररावांनी आपल्या सागवान शेतीच्या क्षेत्रामध्ये वाढ केल्याचे दिसून येते.

संदर्भ : 'कुतूहल : सागवानाची शेती, दैनिक लोकसत्ता, १५ एप्रील २०१८.

कृषी व्यवसायासंबंधी शासकीय योजना :

कृषी व्यवसाय हा मानवी जीवनाच्या उत्क्रांतीतील महत्वपूर्ण व भारतातील सर्वात जुना आणि परंपरागत स्वरुपाचा व्यवसाय असून देशातील शेती क्षेत्राच्या विकासावरच देशातील उद्योगधंदे, आंतरराष्ट्रीय व्यापार, दळणवळण, वाहतूक तसेच सेवा क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्था इत्यादींचा विकास अवलंबून आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ब-याच वर्षापर्यंत भारताला अन्नधान्यांची आयात करावी लागती होती. मात्र आज भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला असून भारत धान्याचे कोठार बनला आहे आज देशातील उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय हे कृषी क्षेत्रावरच आधारित आहेत. कारण कृषी क्षेत्रातून उत्पादन करण्यात येणाऱ्या कच्चा मालावरच औद्योगिक व उद्योग क्षेत्र आपला विकास साध्य करतात. कच्च्या मालावर प्रक्रिया करुन उद्योग क्षेत्र व्यापारात अधिक प्रमाणात उत्पादनाची निर्यात करतात तर भारतातून जी निर्यात केली जाते त्यात कृषी उत्पादीत मालाचा वाटा १० टक्के पेक्षा अधिक आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापारात कृषी मालाचा वाटा महत्वपूर्ण असून विदेशी चलन प्राप्तीचे कृषी क्षेत्र हे महत्वाचे साधन आहे. तर भारतीय कृषीने देशाच्या आर्थिक विकासासह मानवी विकासातही महत्वाची भूमिका बजावली आहे असे लक्षात येते.

वरील विश्लेषणाद्वारे आपणास कृषी क्षेत्राचे महत्व स्पष्ट करीत असताना असे लक्षात येते की, भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था असून ह्या अर्थव्यवस्थेत उद्योग व सेवा क्षेत्राप्रमाणेच कृषी क्षेत्राचेसुध्दा महत्वपूर्ण स्थान आहे, तर भारतीय अर्थव्यवस्था विकसनशिल अवस्थेतून विकसित अर्थव्यवस्थेच्या टप्यात मार्गक्रमण करीत असताना कृषी क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेतील महत्व हळूहळू कमी होत

जाऊन सेवा व उद्योग क्षेत्राचे प्राबल्य वाढत आहे. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक विकासाकडे वाटचाल करीत असल्याचे स्पष्ट होते तर भारताचा आर्थिक विकास होत असून ह्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्र आजही महत्वपूर्ण भूमिका निभावत असल्याचे लक्षात येते, परंतु विकासाचे मापन करणाऱ्या तज्ञांनी कृषी क्षेत्रावर आधारित असलेल्या लोकसंख्येचा विचार केलेला दिसून येत नाही, कारण भारतात आजही ५५ टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.

आज एकीकडे भारताचा विकास होत असताना शेती क्षेत्राचाही विकास तेवढ्याच प्रमाणात होणे गरजेचे होते पण ते शक्य झाले नाही याची अनेक कारणे आहेत जसे की भारतीय शेती आजही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे अनेक वेळा या नैसर्गीक आपत्तींना शेतक-यांना सामोरे जावे लागते, त्यामुळे आधून मधून ओला व कोरडा दुष्काळाला शेतक-यांना नेहमी सामोरे जावे लागते त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो तेंव्हा शेतक-यांनी केवळ शेतीवरच अवलंबून न राहता शेतीबरोबरच इतरही काही कृषीपूरक व्यवसाय केल्यास शेतक-यांना आपली आर्थिक संकटाच्या परिस्थितीमध्ये आपली उपजीविका भागवणे सोपे जाईल व तो अशा आपत्तींचा सहज सामना करु शकेल. अशा पुरक व्यवसायांमुळेच शेतकऱ्यांकडे पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध होईल ज्याचा परिणाम म्हणून तो शेतीमध्ये सुध्दा पून्हा जोमाने कार्य करुन आपले उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करेल. एकंदरित असे म्हणता येईल की, जर कृषी क्षेत्राचा विकास झाला तरच त्याचा परिणाम म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचा विकास सुध्दा गतिमान होतो आणि अर्थव्यवस्थेतील कृषीमालावर आधारित उद्योग, आंतरराष्ट्रीय व्यापारात शेती मालाची निर्यात, त्या निर्यातीतून विदेशी चलनाची अधिक प्राप्ती, अशा विविध बाबीनांही प्रोत्साहन मिळेल, म्हणूनच कृषी क्षेत्राचा विकास व महत्व विचारात घेवूनच सन १९५१ पासून आर्थिक नियोजनास सुरुवात झाली, तर ह्या आर्थिक नियोजनानुसार विविध पंचवार्षिक योजनेतून कृषी विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. आज शासन केवळ शेतीव्यवसायाच्या प्रगतीसाठीच योजना राबवित नाही तर शेतकऱ्यांना शेतीबरोबरच कृषीपूरक व्यवसाय करण्यासाठी शासकनाकडून प्रोत्साहन देण्याचे कार्य होत आहे. आज शासन शेतकऱ्यांना वेगवेगळया योजना आणि धोरणाच्या माध्यमातून कृषीचा आणि शेतक-यांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून अशा कृषी विषयक विकासासाठी शासन राष्ट्रीयीकृत बँकाच्या माध्यमातून विविध धोरणे व योजना रोबवण्याचे कार्य करीत असल्याचे दिसून येते. अशा काही निवडक योजनांचा व धोरणांचा सविस्तर आढावा या प्रकरणातून घेण्यात आला आहे.

कृषी व्यवसायाशी निवडक शासकीय योजना:

१. दुग्ध व्यवसाय योजना.

२. फुल व फलोत्पादन योजना.

३. मत्स्यसंवर्धनयोजना.

४. कुकुटपालन व पोषणसंबंधी योजना.

५. शेळी-मेंढी पालन योजना.

६. जल सिंचन व पाणलोटसंबधी योजना

७. शेतीसाठी लागणाऱ्या यंत्र सामुग्री संबधित शासकीय योजना

संशोधनाची उद्दिष्टे:

1) शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

2) शेतकऱ्यांसाठी असलेल्या शासकीय योजना व सुविधांचा लाभ होऊन शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

3) शासकीय योजनांचा लाभ व शेतकऱ्यांची आर्थिक बचत यांचा अभ्यास करणे.

4) शेतकरी सर्वाधिक कोणत्या शासकीय योजनेचा लाभ घेतात याचा अभ्यास करणे

5) प्रशासकीय योजना फायदेशीर झाल्या आहेत का नाही याचा अभ्यास करणे.

6) शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचा अभ्यास करणे.

7) कोणत्या शासकीय योजनांचे जिल्ह्यात सर्वात जास्त व कमी लाभार्थी आहेत याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके:

1) जिल्ह्यातील निवडक शासकीय योजनांचा लाभार्थ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली नाहीये.

2) नांदेड जिल्ह्यातील निवडक शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांच्या बचतीत लक्षणीय वाढ झालेली नाहीये.

3) नांदेड जिल्ह्यातील निवडक शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांच्या गुंतवणुकीत लक्षणीय वाढ झालेली नाहीये.

4) नांदेड जिल्ह्यातील निवडक शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांच्या वार्षिक खर्चात लक्षणीय वाढ झालेली नाही.

5) नांदेड जिल्ह्यातील निवडक शासकीय योजना लाभार्थ्यांच्या लागवडी खालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली नाही.

संशोधनाची गरज व महत्त्व:

भारत हा कृषीप्रधान देश आहे शेतकऱ्यांसाठी सरकारी योजना का आवश्यक आहेत? योजनांचा लाभ घेतल्यामुळे त्यांच्या राहणीमानात काही बदल होतो का? योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचणी कोणकोणत्या आहेत? त्या अडचणी दूर करण्याचे उपाय कोणते आहेत? योजनेमुळे उत्पादन वृद्धी होते का? तसेच व्यवसाय वृद्धी होते का? सरकारला यायोजना कश्या फायदेशीर, जनतेला कसे फायदेशीर या सर्व प्रश्नानांची उकल करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

संशोधन पद्धती:

a) माहिती संकलन:-

संशोधन कार्यासाठी विश्लेषण पद्धती व त्यासाठी संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला जाईल आकडेवारी विश्लेषण केली जाईल यासाठी सहाय्यक नमुना निवड पद्धती वापरली जाईल.

b) नमुना आकार व नमुना निवड पद्धती.

नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्यांपैकी दहा तालुक्याची निवड साध्या यादृच्छिक पद्धतीने केली जाईल. प्रत्येक तालुक्यामधून दोन गावांची यादृच्छिक पद्धतीने निवड केली जाईल निवडलेल्या गावातून शेतकऱ्यांची संहेतुक पद्धतीने निवड केली जाईल याप्रमाणे 1000 लाभार्थी नांदेड जिल्ह्यातील निवडले जातील.

विश्लेषणाची साधने:

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती साधने वापरली जाईल. प्रामुख्याने पुस्तके, नियतकालिके, शोध प्रबंध, शोधनिबंध, वर्तमानपत्रे, शासकीय दस्तावेज, website व इतर प्रकाशित साहित्यातून घेतली जाईल 2010 ते 2020 हा कालखंड विचारात घेतला जाईल. माहिती ही प्रत्यक्ष लाभार्थ्यांकडून मुलाखतीद्वारे गोळा केली जाईल. यासाठी आदर्श प्रश्नावली तयार केली जाईल. व अनुसूचिद्वारे माहिती गोळा केली जाईल. ज्यामध्ये संशोधन संबंधी सर्व प्रश्नांचा समावेश असेल ज्यामध्ये संशोधनाची उद्दिष्टे व गृहितके पूर्ण होतील. गोळा झालेल्या माहितीचे विश्लेषण करताना सांख्यिकीय साधनांचा ज्यामध्ये वर्गीकरण, तक्ते, आकृत्या, याचबरोबर संख्याशास्त्रीय चाचण्या ज्यामध्ये t-test, x2 test यांचा वापर करण्यात येईल.

संसोधानाचे क्षेत्र:

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील क्षेत्र आभ्यासासाठी विचारात घेतले जाईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

प्रस्तुत संशोधनामध्ये शेतक-यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये निवडक शासकीय योजनाचे योगदान याचा अभ्यास करत असताना विशेष म्हणजे नांदेड जिल्ह्याचा संदर्भ घेऊन अभ्यास करण्यात येणार आहे, प्रस्तुत संशोधनात कृषीपूरक व्यवसायातील दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी व मेंढी पालन, फुलशेती, फळशेती व भाजीपाला शेती इत्यादी कृषीपूरक व्यवसायासाठी असलेल्या निवडक शासकीय योजनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची प्रकरण योजना:

१) प्रास्ताविक

२) निवडक सरकारी योजनांचा आढावा

३) नांदेड जिल्ह्याची रचना

४) प्राथमिक व द्वितीय माहितीचे विश्लेषण

५) संशोधनाचे निष्कर्ष

६) संशोधनावर आधारित सूचना

संदर्भ सूची:

1. डॉ. पटेल सुधीर कुमार, 'कृषीमध्ये प्रगती के अवसर, कुरु क्षेत्र, अंक, ५४, फेब्रुवारी २००८ वर्ष ०४ पृ. क्र. ४ ते ७.
2. सहस्त्रबुध्दे विनाश विनायक , 'शेती- भारत देशाला लाभलेले बहुमूल्य वरदान
3. कच्छल दिपीका आणि ललिता खुराना, 'पशुपालन. विविध आयाम', कुरुक्षेत्र
4. 'कुतूहल: सागवानाची शेती, दैनिक लोकसत्ता, १५ एप्रील २०१८.
5. पाटील प्रतिमा प्रकाशराव (२०१३), "उस्मानाबाद जिल्ह्याच्या कृषी विकासात फळ बागांची भूमिका" पीएच.डी. प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

संकेतस्थळे:

1. https://dfpd.gov.in
2. https://en.m.wikipedia.org
3. https://fao.org
4. https://adesh.maharashtra.gov.in
5. www.maharashtra.gov.in
6. www.researchgate.net

संशोधक

संशोधन मार्गदर्शक

पूनम गंगाधरराव रामोड

प्रा. डॉ. विजय ना. भोपाळे
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा (जं.)
जिल्हा.परभणी